# नवी मुंबई महानगरपालिका

## आरोग्य विभाग

## जाहिर सूचना

जावक क्रमांक - नमुंमपा/आरोग्य/1078/2021 दिनांक 27 /03/2021

विषय : कोरोना विषाणु (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेत एकत्रित ठोक मानधन तत्वावर 6 महिने किंवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडेल तोपर्यंत कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेनूसार मनुष्यबळ उपलब्ध करणेबाबत.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोरोना विषाणू (कोविड - 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य विभागांतर्गत काम करण्यासाठी पात्र व इच्छूक उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात प्रतिमहा ठोक मानधनावर कंत्राटी (करार) पध्दतीने मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेकरीता जाहिरात क्रमांक 03/2020, दि.17/07/2020 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरात क्रमांक 03/2020 व अर्ज सादर करण्याची गुगल लिंक नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.nmmc.gov.in) वर पाहण्यास उपलब्ध आहे. सदर लिंक ही दि.02/04/2021 पर्यंत अर्ज सादर करण्यासाठी खुली राहील. सध्या आवश्यक असलेल्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | आवश्यक मनुष्यबळाची संख्या | मासिक ठोक एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|
| 1 | वैदयकशास्त्र तज्ञ (MD Medicine) | 15 | 2,50,000/- |
| 2 | मेडिकल मायक्रोबायोलॉजिस्ट (Medical Microbiologist) | 05 | 2,50,000/- |
| 3 | इंटेन्सिव्हिस्ट (Intensivist) | 10 | 2,50,000/- |
| 4 | एम.बी.बी.एस. | 50 | 1,00,000/- |
| | बी.ए.एम.एस. | 75 | 75,000/- |
| | बी.एच.एम.एस. | 40 | 60,000/- |
| | बी.यु.एम.एस. | 10 | 60,000/- |
| 5 | स्टाफ नर्स (Staff Nurse) | 200 | 45,000/- |
| 6 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Lab Technician) | 20 | 30,000/- |
| 7 | कनिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Junior Lab Technician) | 15 | 20,000/- |
| 8 | ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ (ANM) | 40 | 35,000/- |
| 9 | बेडसाईड सहाय्यक (Bedside Assistant) | 40 | 20,000/- |

यापूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही. उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे व महानगरपालिकेच्या आवश्यकतेनूसार कागदपत्रे पडताळणीसाठीचा दिनांक व वेळ ई-मेल/एस.एम.एस. द्वारे कळविण्यांत येईल. पदसंख्येमध्ये आवश्यकतेनूसार बदल करण्याचा अधिकार आयुक्त यांना राहील. नियुक्तीबाबतच्या इतर अटी/शर्ती, मानधन व विशेष सूचना जाहिरात क्रमांक 03/2020 नूसार कायम राहतील.

सही /-

(अभिजीत बांगर)

आयुक्त तथा प्रशासक

# नवी मुंबई महानगरपालिका

## आरोग्य विभाग

**नवी मुंबई महापालिका मुख्यालय, से.15 किल्ले गावठाण, बेलापूर, नवी मुंबई.**

जाहिरात क्रमांक - 03/2020 दिनांक 17/07/2020

**जाहिरात शुध्दीपत्रक**

**विषय : कोरोना विषाणु (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्वावर ६ महिने किंवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यत, जे आधी घडेल तोपर्यंत कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेनूसार मनुष्यबळ उपलब्ध करणेबाबत.**

उपरोक्त् विषयाबाबतची जाहिरात क्रमांक 03/2020 दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये दि. 17/07/2020 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमधील खालील संवर्गात आवश्यक मनुष्यबळाच्या संख्येत व संवर्गामध्ये बदल करण्यात येत आहेत. तसेच मूळ जाहिरामधील अटी/शर्ती व विशेष सूचना कायम राहतील.

| अ.क्र. | पदनाम | पात्रता (Qualification) | आवश्यक मनुष्यबळाची संख्या | मासिक ठोक एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ६ | **प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Lab Technician)** | 1. Master of Science (M.Sc) Molecular Biology or Biotechnology or Genetics or Bio Chemistry or Microbiology qualification from recognized University or Institution.<br>Or<br>Bachelor of Science (B.Sc) and Diploma in Medical Technology (DMLT) qualification from recognized University or Institution. | ६४ | ३०,०००/- |
| १० | **माहिती नोंदणीकार (Data Entry Operator)** | 1. मान्यताप्राप्त विद्यापिठाचा पदवीधर असावा<br>2. महाराष्ट राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा DOEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. | १०४ | २०,०००/- |
| ११ | **कनिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Junior Lab Technician)** | 1. 12th Pass<br>2. DMLT/CMLT Course | ५६ | २०,०००/- |

**सही/-**

**(अभिजीत बांगर)**

**आयुक्त तथा प्रशासक**

**नवी मुंबई महानगरपालिका**

# नवी मुंबई महानगरपालिका

## आरोग्य विभाग

### नवी मुंबई महापालिका मुख्यालय, से.15 किल्ले गावठाण, बेलापूर, नवी मुंबई.

जाहिरात क्रमांक - 03/2020 दिनांक 16/07/2020

**विषय : कोरोना विषाणु (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्वावर ६ महिने किंवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यत, जे आधी घडेल तोपर्यंत कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेनूसार मनुष्यबळ उपलब्ध करणेबाबत.**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोरोना विषाणू (कोव्हीड – १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात काम करण्यासाठी पात्र इच्छूक उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात प्रतिमहा ठोक मानधनावर कंत्राटी (करार) पध्दतीने सेवा घेणेबाबत ऑनलाईन पध्दतीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.nmmc.gov.in) उपलब्ध असलेल्या गुगल फॉर्म लिंक (Google Form link) द्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांच्या मुलाखती दिनांक 20/07/2020 (सार्वजनिक सुट्टी वगळून) पासून घेण्यात येतील.

| अ. क्र. | पदनाम | पात्रता (Qualification) | आवश्यक मनुष्यबळाची संख्या | मासिक ठोक एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | **वैदयकशास्त्र तज्ञ (MD Medicine)** | 1. मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.डी. (मेडिसीन) पदवी | ३० | २,५०,०००/- |
| २ | **मेडिकल मायक्रोबायोलॉजिस्ट (Medical Microbiologist)** | 1. MD Microbiology<br>2. Experience : Working with Molecular Diagnostic laboratory specialization in Molecular Virology | ४ | २,५०,०००/- |
| ३ | **इंटेन्सिव्हिस्ट (Intensivist)** | 1. MD/DNB Medicine/Anesthesia/Critical care/Chest with IDCCM/ MBBS, DA/MBBS, DTCD with IDCCM with 2-3 years experience in ICU | ३५ | २,५०,०००/- |
| ४ | **कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी (Junior Medical Officer)** | | | |
| | **एम.बी.बी.एस.** | 1. मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी<br>2. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (M.M.C.)/मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया (M.C.I.) कडील नोंदणी आवश्यक आहे. | ३०० | १,००,०००/- |
| | **बी.ए.एम.एस.** | 1. मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस. पदवी<br>2. महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन (M.C.I.M.)/सेंन्ट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन (C.C.I.M.) कडील नोंदणी आवश्यक आहे. | १००० | ७५,०००/- |
| | **बी.एच.एम.एस. / बी.यु.एम.एस.** | 1. मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.एच.एम.एस./बी.यु.एम.एस. पदवी<br>2. महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी (M.C.H) कडील नोंदणी आवश्यक आहे. | ५०० | ६०,०००/- |
| ५ | **स्टाफ नर्स (Staff Nurse)** | 1. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची 12 वी विज्ञान शाखेतील परिक्षा उत्तीर्ण.<br>2. महाराष्ट्र नर्सिग कौन्सिलची जनरल नर्सिग व मिडवाईफरी या विषयाची पदवीका (GNM) किंवा बी. एस्सी. नर्सींग<br>3. महाराष्ट्र नर्सिग कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक आहे | १००० | ४५,०००/- |

| अ. क्र. | पदनाम | पात्रता (Qualification) | आवश्यक मनुष्यबळाची संख्या | मासिक ठोक एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ६ | **प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Lab Technician)** | 1. Master of Science (M.Sc) Molecular Biology or Biotechnology or Genetics or Bio Chemistry or Microbiology qualification from recognized University or Institution.<br>Or<br>Bachelor of Science (B.Sc) and Diploma in Medical Technology (DMLT) qualification from recognized University or Institution. | १२ | ३०,०००/- |
| ७ | **औषध निर्माता (Pharmacist)** | D.Pharm<br>OR<br>B.Pharm | ५० | ३०,०००/- |
| ८ | **ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ (ANM)** | 1. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण.<br>2. शासन मान्यता प्राप्त संस्थेचा ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ (ANM) अभ्यासक्रम पूर्ण.<br>3. महाराष्ट्र नर्सिग कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक. | ८०० | ३५,०००/- |
| ९ | **बेडसाईड सहाय्यक (Bedside Assistant)** | Certificate in Bedside Assistant<br>OR<br>12th Pass and 2 Year Experiences in Hospitals/Clinics<br>OR<br>OT Technician<br>NCVT/ MSCVT यांचा मान्यताप्राप्त कोर्स | १६०० | २०,०००/- |
| १० | **माहिती नोंदणीकार (Data Entry Operator)** | 1. मान्यताप्राप्त विद्यापिठाचा पदवीधर असावा<br>2. महाराष्ट राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा DOEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. | ५० | २०,०००/- |

**अटी व शर्ती :-**

१. उमेदवारांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmmc.gov.in दिलेल्या गुगलफॉर्म लिंकचा वापर करुन आपली माहिती अचूक व काळजीपूर्वक सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक व वेळ तसेच टोकन क्रमांक ई-मेलद्वारे कळविण्यांत येईल.
२. **वयोमर्यादा** :- उमेदवाराचे वय दिनांक ३०/०६/२०२० रोजी ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.
३. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
४. उपरोक्त पदाकरिंता सेवा देणेचा हा ६ महिने किंवा कोरोना (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत असेल.
५. निवड झालेल्या उमेदवाराने कामावर हजर होणेपूर्वी विहित केलेल्या नमुन्यातील घोषणापत्र महानगरपालिकेकडे सादर करणे आवश्यक राहील.

६. उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मूळ कागदपत्रासह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मूळ कागदपत्राच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेऊन थेट मुलाखतीस हजर राहणे आवश्यक आहे. कागदपत्रांच्या प्राथमिक छाननी नंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.
७. उमेदवारांची जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची स्व-साक्षांकित (self attested) प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची स्व-साक्षांकित (self attested) प्रत जोडणे आवश्यक राहील.
८. उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा.
९. उमेदवाराचे नाव बदलले असेल तर नाव बदलासाठी उमेदवाराने विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा राजपत्रातील प्रत सादर करावी. उमेदवार मूळ नावाने (Maiden Name) देखील अर्ज करू शकतात.
१०. जाहिरातमधील विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या स्व-साक्षांकित (self attested) प्रती नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.
११. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
१२. नियुक्त उमेदवारांना कोव्हिड-१९ संबंधित सर्व कर्तव्य पार पाडावे लागेल.
१३. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचेकडील पत्र क्रमांक करोना २०२०/प्र.क्र.८४/आरोग्य-५, दि.११/०४/२०२० नुसार निवड झालेले उमेदवार प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेजअंतर्गत रू.५०,००,०००/- (अक्षरी पन्नास लाख रूपये मात्र ) चे विमा संरक्षणास पात्र राहतील.
१४. निवडीच्या कोणत्याही टप्यावर अर्जदाराने खोटी कागदपत्रे सादर केल्याचे आढळल्यास, गैरवर्तन करतांना आढळल्यास, दबाबतंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्याची उमेदवारी रद्द केली जाईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची सदर सेवा समाप्त करण्यात येईल.
१५. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
१६. उमेदवारास सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने त्यासंदर्भात ३० दिवसांची आगाऊ नोटीस देणे आवश्यक राहील. राजीनामा सादर न करता परस्पर काम सोडून गेल्यास मानधन कपात करण्यात येईल.
१७. ही सदर सेवा नियुक्ती केवळ साथरोगाच्या कालावधीसाठी संपुर्णपणे तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावरील कंत्राटी (करार) पध्दतीने असल्याने उमेदवारास कायमस्वरूपी नियुक्ती मागणीचा हक्क असणार नाही.
१८. सदर जाहिरातीस प्रतिसाद कमी असेल तर सदर पदांसाठीच्या पात्रतेच्या अटी शिथील करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना आहेत.
१९. नियुक्तीबाबतचे आदेश / सूचना उमेदवारांना त्यांनी दिलेल्या ई-मेल वर कळविण्यांत येतील.

**विशेष सूचना :-**

१. सदर जाहिरात ही पात्र उमेदवारांची प्रारुप गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी आहे. त्यामूळे आवश्यकते प्रमाणे म्हणजेच महानगरपालिकेला गरज भासेल त्याप्रमाणे प्रारुप गुणवत्ता यादीतून कंत्राटी पध्दतीने उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.
२. यापूर्वी सादर केलेले कोणतेही अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
३. कोणताही अर्ज पोस्टाद्वारे / टपालाद्वारे स्वीकारले जाणार नाही.
४. उमेदवाराने मुलाखतीच्या वेळी मूळ अंतिम वर्षाची गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्रासह इतर सर्व आवश्यक प्रमाणपत्रे व त्यांच्या स्व-साक्षांकित (self attested) झेरॉक्स प्रती, स्वत:चे पासपोर्ट आकाराच्या फोटोसह उपस्थित रहावे.
५. उमेदवाराने कामाच्या अनुभवाची मूळ प्रमाणपत्रे त्यांच्या स्व-साक्षांकित (self attested) झेरॉक्स प्रतीसह उपस्थित रहावे.

६. **मुलाखतीचे ठिकाण:** नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, ज्ञानकेंद्र, तिसरा मजला, प्लॉट क्रमांक १/२, पाम बीच रोड, सेक्टर - १५ ए , सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, ४०० ६१४

७. उमेदवारांच्या थेट मुलाखती ह्या दिनांक २० जूलै २०२० पासून सर्व कामाच्या दिवशी (सार्वजनिक सुट्टी वगळून) घेण्यात येतील. सकाळी ११.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

**सही/-**

**(अभिजीत बांगर)**

**आयुक्त तथा प्रशासक**

**नवी मुंबई महानगरपालिका**